# मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ०७/०६/२०१९ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

<table>
<tr><td>१४. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. ०६/१२/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>१) शहरामध्ये किती ठिकाणी “बाजार ठेके” देण्यात येतात?</td><td></td><td>मिरा भाईंदर शहरामध्ये ४ ठिकाणी बाजार ठेके दिलेले आहेत.<br>१) भाईंदर (प.) विभाग<br>२) भाईंदर (पूर्व) विभाग<br>३) मिरारोड ते चेणा विभाग<br>४) मुर्धे ते उततन विभाग</td></tr>
<tr><td>अ) सन एप्रिल २००७ नंतर प्रत्येक वर्षी किती रक्कमेचे ठेके देण्यात आले व प्रत्येक वर्षी किती रक्कम मनपाकडे जमा झाली?</td><td></td><td>सन एप्रिल २००७ नंतर प्रत्येक वर्षी किती रक्कमेचे ठेके देण्यात आले व किती रक्कम मनपाकडे जमा झाली त्याची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.
<table>
<tr><th>वर्ष</th><th>ठेक्याची रक्कम</th><th>वसुल झालेली रक्कम</th></tr>
<tr><td>2007-08</td><td>264.00</td><td>276.64</td></tr>
<tr><td>2008-09</td><td>300.00</td><td>269.16</td></tr>
<tr><td>2009-10</td><td>320.00</td><td>240.84</td></tr>
<tr><td>2010-11</td><td>400.00</td><td>373.40</td></tr>
<tr><td>2011-12</td><td>480.00</td><td>452.05</td></tr>
<tr><td>2012-13</td><td>530.00</td><td>505.25</td></tr>
<tr><td>2013-14</td><td>531.00</td><td>578.33</td></tr>
<tr><td>2014-15</td><td>750.00</td><td>694.93</td></tr>
<tr><td>2015-16</td><td>511.00</td><td>543.72</td></tr>
<tr><td>2016-17</td><td>580.04</td><td>552.02</td></tr>
<tr><td>2017-18</td><td>663.00</td><td>674.94</td></tr>
<tr><td>2018-19</td><td>671.00</td><td>620.68</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ब) शहरामध्ये किती फेरिवाले आहेत याची मनपा मोजणी करते का? असल्यास एप्रिल २००७ नंतर प्रत्येक वर्षाची फेरिवाल्यांची संख्या किती? | | शहरामध्ये किती फेरिवाले आहे याची मनपा मोजणी झालेली नाही. फेरीवाला सर्वेक्षण करणेकामी समाजकल्याण विभागाकडून फेरीवाला सर्वेक्षण करणेकामी प्राप्त निविदांना मंजूरी घ्यावयाची कार्यवाही सुरु आहे. |
| १५. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. ०६/१२/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) किती व कोणते लॉजिंग बोर्डींग आहेत? | | सदरची माहिती प्रभाग समिती कार्यालय क्र. १ ते ६ यांच्या कार्यालयात उपलबध आहेत. प्रभाग समिती क्र. २ ची माहिती निरंक आहे. |
| अ) कोणत्या व कधी लॉजिंग बोर्डींगनी परवाने घेतलेले आहेत व त्यांचे नुतनीकरण केलेले आहे? | | सोबत यादी जोडली आहे. |
| ब) किती व कोणते लॉजिंग बोर्डींग अनधिकृत आहेत? | | सदरची माहिती प्रभाग समिती कार्यालय क्र. १ ते ६ यांच्या कार्यालयात उपलबध आहेत. प्रभाग समिती क्र. २ ची माहिती निरंक आहे. |
| क) कोणत्या अनधिकृत लॉजिंग बोर्डींगवर कोणती कारवाई करण्यात आली? | | जा.क्र.मनपा/आ.प./३४७/२००८-०९ अन्वये दि. १८/०२/२००९ रोजी २३ लॉजिंग-बोर्डींगचे परवाने रद्द केले. |
| ड) कोणत्या अनधिकृत लॉजिंग बोर्डींगवर MRTP अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले? | | निरंक |
| इ) एप्रिल २००८ नंतर किती अनधिकृत लॉजिंग बोर्डींगला परवाने देण्यात आले? | | ७४ |
| १६. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. १०/१२/२०१८ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) आरक्षण क्र. २१४ (बगीचा) एकूण क्षेत्रफळ किती? | | आरक्षण क्र. 214 (बगीचा) चे एकूण क्षेत्रफळ 10500 चौ.मी. आहे. |
| अ) या आरक्षणाच्या अनुषंगाने मा. महासभा प्र.३३ पारित झालेल्या ठरावाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली? | | सदरील आरक्षण समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकसीत करणेकामी प्रस्ताव दाखल झाला असून सदरील प्रस्ताव अद्याप छाननी स्तरावर आहे. |
| ब) या आरक्षणाचे एकूण क्षेत्रफळ मनपाच्या ताब्यात आले आहे? | | सदर आरक्षणाचे 1478.25 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. |
| क) या ताब्यात आलेल्या आरक्षणाच्या बदल्यात कोणाला किती, कधी, विकास हक्क प्रमाणपत्र देण्यात आले? | | सोबत यादी जोडली आहे. |
| ड) या एकूण आरक्षणाचे अधिकार पत्र धारक कोण आहेत? | | आरक्षण क्र. 214 (बगीचा) मधील महानगरपालिकेच्या ताब्यातील 1478.25 चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेचे असून उर्वरित क्षेत्र खाजगी मालकीचे आहे. |

| | | |
|---|---|---|
| इ) हे आरक्षण समावेशक आरक्षणाखाली विकसित करण्याबाबत मनपाने अजून पर्यंत कोणती कार्यवाही केली? | | सदरील आरक्षण समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकसीत करणेकामी प्रस्ताव दाखल झाला असून सदरील प्रस्ताव अद्याप छाननी स्तरावर आहे. |
| १७. श्रीम. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. ०८/०२/२०१९ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि. ०५/०७/२०१६ मधील प्रकरण क्र. ३२ मधील सुचना - पुतळे उभारण्याबाबत ठराव पास झाला त्यामध्ये मराठी मनातील ४ थोर महान पुरुष व माता (१) जिजा माता - मिरारोड स्टेशन बाहेर, (२) लोकमान्य टिळक - मॅक्सस मॉल चौकी जवळ (३) सावित्रीबाई फुले - नवघर मैदान (४) वि. वा. सावरकर - सावरकर चौक गोल्डन नेस्ट येथे पुतळे उभारणे या संदर्भात पुढील कार्यवाही काय केली व करणार? | | मा. महासभेच्या मान्यतेनंतर निविदा प्रक्रिया करुन पुतळ्यासाठी चबुतरा बांधण्याची कामे मंजूर करण्यात येऊन शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पुतळा-3116/प्रक्र.308/29, दि. 2 मे 2017 अन्वये पोलीस विभागाकडे नाहरकत दाखला देण्यासाठी कळवून पाठपुरावा करण्यात येत आहे.<br>पुतळा उभारणाऱ्या संस्थांची नेमणूक करुन क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. तद्नंतर मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांना प्रस्ताव पाठवून रेखाचित्राबाबत मान्यता घ्यावयाची आहे. तसेच नगरविकास विभाग, मंत्रालय यांची मान्यता घेवून मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समिती समोर प्रस्ताव ठेऊन त्यांच्या मान्यतेने प्रत्यक्षात पुतळा बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. |

(दिपक पुजारी)
उप-आयुक्त (मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका